नोंदणी क्रमाक एएनआर/बीएनके/१६१/१९७८ दिंनाक ६-४-१९७८

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर

‘कुदंननगरी’ डॉ.आबेंडकररोड,माळीवाडा,अहिल्यानगर .

जावक कंमाकः-अवासभा-2025/26 दिंनाकः-22-06-2025

## अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेचे सर्व सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, संस्थेची सन 2024-2025 या सहकारी वर्षाची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिंनाक 14-09-2025 रोजी सकाळी ठिक 11 वाजता नंदनवन लॉन टिळकरोड अहिल्यानगर येथे चेअरमन श्री.सदानंद लहानू डोखे यांचे अध्यक्षेतेखाली खालील विषयावंर विचार विनिमय व निर्णय घेण्यासाठी बोलाविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस सहभागी व्हावे. हि. विनंती

– सभेपुढील विषय –

1. नियोजीत अध्यक्ष यांना अध्यक्षपद स्विकारणेस मंजूरी देणे.
2. संस्थेच्या दिवंगत सभासदांना श्रध्दांजली अर्पण करणे.
3. गुणवंत सभासद / पाल्य तसेच सेवानिवृत्त सभासद यांचा सपत्नीक सत्कार करणे.
4. मागील अधिमंडळाचे वार्षिक साधारण सभेचे प्रोसिंडींग वाचून मंजूर करणे.
5. सन 2024-2025 सालाचा वार्षिक अहवाल, तेरीज, ताळेबंद,नफातोटा, दिं. 31-03-2025 चे मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
6. सन 2024-2025 चा वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल वाचून सन 2023-2024 चा लेखापरिक्षण दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
7. सन 2025-2026 या सालाकरीता वैधानिक व अंतर्गत लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
8. सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी बॅकेकडे कॅश केडीट क्लीन कर्ज प्रकरण करणेसाठी संचालक मंडळास अधिकार देणे
9. संस्था व सभासदांचे हिताचे निर्णय घेण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास देणे.
10. अधिमंडळाच्या वार्षिक सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
11. मा.अध्यक्षांचे पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणारे विषयांचा विचार करणे.

| श्रीमती अर्चना प्रकाश गुंड | श्री.नवनाथ बारकु गोरे | श्री.सदानंद लहानू डोखे |
|---|---|---|
| मानदसचिव | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री.सुर्वे ज्ञानेश्वर देवराम | श्री.पगारे सुधाकर प्रभाकर | श्री थिगळे संतोष तात्याबा |
| श्री.साळे श्रीकांत बाबासाहेब | श्री.उंडे सुधिर दशरथ | श्री.साबळे संतोष कचरू |
| श्री.मडके गोटीराम अंकुश | श्री.देशमुख रवि हरिश्चंद्र | श्री.सातपुते प्रशात दशरथ |
| श्री.साबळे प्रताप हनुमंत | श्री.भालेराव हरीष शिवराम | श्री.ज्ञानदेव शिवाजी अडसुरे |
| श्री.जेजुरकर किशोर किसनराव | श्री.खंडागळे संतोष हरिभाउ | श्रीमती लांडगे सुरेखा सदाशिव |
| श्रीमती परोडकर संगिता किसनराव | श्री.बरबडे प्रशात माधवराव (तज्ञ संचालक) | श्री.जाधव रामदास फक्कडराव (तज्ञसंचालक) |

छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर

टिपः- 1. सभेस आवश्यक ती गणपुर्ती न झाल्यास अर्धातास सभा तहकूब ठेवण्यात येईल. वत्यांन्तर उपस्थितांचे हजेरीत त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल. त्यावेळेस गणपुर्तीची अवश्यकता असणार नाही

2. सन 2024-2025 सालाचे वार्षिक सभेचे अनुषंगाने काही सुचना अथवा विचार असल्यास त्या दिंनाक 10.09.2025 पुर्वी संस्थेस लेखी स्वरूपात मिळतील अश्या रितीने पाठवाव्यात.

नोंदणी क्रमाक एएनआर/बीएनके/१६१/१९७८ दिंनाक ६-४-१९७८
**छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर**
‘कुदंननगरी’ डॉ.आबेंडकररोड,माळीवाडा,अहिल्यानगर .

श्रध्दांजली

अहवाल सालात व दरम्यानच्या कालावधीत जे देशभक्त, स्वातंत्र सेनानी, थोर नेते, धारातीर्थ्यी पडलेले जवान, लेखक, संशोधक, कवी , साहित्यीक, कलावंत, शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ, सामाजिक व सहकारी कार्यकर्ते आपल्या संस्थेचे सभासद, हितचिंतक, दिवगंत झाले त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपुर्ण श्रध्दांजली....

- संचालक मंडळ -
व सर्व सभासद बंधू- भगिनी
व सेवक वर्ग

नोंदणी क्रमाक एएनआर/बीएनके/१६१/१९७८ दिंनाक ६-४-१९७८

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर

‘कुदंननगरी’ डॉ.आबेंडकररोड,माळीवाडा,अहिल्यानगर .

## संचालक मंडळ

| अ.नं. | संचालक मंडळ नांव | पद | |
|---|---|---|---|
| 1 | श्री.डोखे सदानंद लहानू | चेअरमन | |
| 2 | श्री.गोरे नवनाथ बारकु | व्हाईस चेअरमन | |
| 3 | श्रीमती गुंड अर्चना प्रकाश | मानदसचिव | |
| 4 | श्री.सुर्वे ज्ञानेश्वर देवराम | संचालक | |
| 5 | श्री.पगारे सुधाकर प्रभाकर | संचालक | |
| 6 | श्री.थिगळे संतोष तात्याबा | संचालक | |
| 7 | श्री.साळे श्रीकांत बाबासाहेब | संचालक | |
| 8 | श्री.उंडे सुधिर दशरथ | संचालक | |
| 9 | श्री.साबळे संतोष कचरू | संचालक | |
| 10 | श्री.मडके गोटीराम अंकुश | संचालक | |
| 11 | श्री.देशमुख रवि हरिश्चंद्र | संचालक | |
| 12 | श्री.सातपुते प्रंशात दशरथ | संचालक | |
| 13 | श्री.साबळे प्रताप हनुमंत | संचालक | |
| 14 | श्री.भालेराव हरीष शिवराम | संचालक | |
| 15 | श्री.अडसुरे ज्ञानदेव शिवाजी | संचालक | |
| 16 | श्री.जेजुरकर किशोर किसनराव | संचालक | |
| 17 | श्री.खंडागळे संतोष हरिभाउ | संचालक | |
| 18 | श्रीमती लांडगे सुरेखा सदाशिव | संचालक | |
| 19 | श्रीमती परोडकर संगिता किसनराव | संचालक | |
| 20 | श्री.बरबडे प्रंशात माधवराव | तज्ञ संचालक | |
| 21 | श्री.जाधव रामदास फक्कडराव | तज्ञ संचालक | |
| | कर्मचारी वर्ग | | |
| | श्री.शेडाळे राजेंद्र सुखदेव | व्यवस्थापक | |
| | श्री.घिगे पवनकुमार पोपटराव | सेक्रेटरी | |

नोंदणी क्रमाक एएनआर/बीएनके/१६१/१९७८ दिंनाक ६-४-१९७८

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर

'कुदंननगरी' डॉ.आबेंडकररोड,माळीवाडा,अहिल्यानगर .

## ४७ वा वार्षिक अहवाल
## सन २०२४-२०२५

सन्मानिय सभासद बंधू - भगिनीनो-

संस्थेच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण सर्वजण आवर्जून उपस्थित आहात. याबद्यल प्रथमतः मी सर्वांचे मनापासून स्वागत करतो. आपले संस्थेचा ४७ वा वार्षिक अहवाल सर्व संचालक मंडळाचे वतीने मी आपणास सादर करत आहे. याचा मला मनापासून आनंद होत आहे. आपले संस्थेची स्थापना ६ एप्रिल 1978 रोजी झाली व आज आपण ४८ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करणार आहोत. आपल्या संस्थेचे नांव स्थापनेपासून अहमदनगर जिल्हा सहायक ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर असे होते. त्यांत संस्थेने दिंनाक २४.१२.२०१३ रोजी छत्रपती शिवाजीराजे ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर असे नामकरण केलेले होते. आपल्या ग्रामसेवक या पद नामावलीमध्ये बदल होवून आपण सर्व ग्रामपंचायत अधिकारी या पदावर कार्य करीत असल्याने आपले संस्थेचे नांवातही आपण छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर या नांवाने आता शासनदरबारी आहोत.आपल्या अग्रगण्य सहकारी सस्थेची सर्वाच्या सहकार्याने उत्तरोत्तर प्रगती होत आहे. व स्पर्धात्मक वातावरणातही संस्थेने नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. व महाराष्ट्र राज्यात ख-या अर्थाने लोकशाही तत्वावर चालणारी एकमेव संगणीकृत संस्था म्हणून नावलौकीक मिळविला आहे. ज्या सामाजीक बांधलीकीतून संस्थेची स्थापना झाली ते कार्य आपल्या कार्यक्षमतेने व जबाबदारी पार पाडण्यात संस्था यशस्वी झालेली आहे. अर्थात या सर्वांचे श्रेय आपणा सर्वाना आहेच. तसेच संस्थेन चालू वर्षी एस.एमएस.सेवा व ईमेल सुध्दा चालू केलेला आहे. ई मेल ॲड्रेस shivajigramsevak@gmail.com असा आहे. आपण सर्वानी संचालक मंडळावर टाकलेला प्रंचड विश्वास व श्रध्दा यामुळेच संस्था गरूडझेप घेवू शकली.आपणा सर्वांचे संस्थेवरील प्रेम, निष्ठा व अढळश्रध्दा अशीच राहून भविष्यात ती वृध्दींगत होईल. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सर्वांचे पुनश्चः स्वागत...

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. अहिल्यानगर या वित्तिय संस्थेने आपले संस्थेस सरासरी १३ % दराने कर्जपुरवठा आपले संस्थेस केलेला आहे. परंतू आपले संस्थेने सभासदांचे हिताकरीता केवळ नफा हा हेतू न ठेवता आपले सभासदांना रू. ६ लाखा पर्यतचे कर्जास ७ % व तातडी कर्ज रू.१ लाख १३ % इतक्या अल्पव्याज दराने कर्ज पुरवठा केलेला आहे. तसेच रू ६ लाखावरील कर्जास १३ % व्याज आकारणी केलेली आहे. व सभासदांनी सन २०२४-२०२५ सालात भरलेल्या व्याजावर ७ % व्याज रिबेट देण्याचे धोरण आखलेले आहे. संस्थेने सभासदा कडून घेतलेले व्याज व वित्तिय संस्थेस दिलेले व्याज यात फार मोठी तफावत आहे. यात कोणत्याही प्रकारचे आर्थिक हित नसून फक्त सभासदांचे हित जोपासलेले आहे. तसेच संस्थेचे सभासदांची कर्जमर्यादा, देयपगाराचे ३० पट किंवा जास्तीत जास्त रू. २५ लाख करणेत आलेली असून तातडी कर्ज रू. १ लाख करण्यात आलेले आहे.

सदरची तफावत पहाता. परंतू कमीतकमी खर्चात संस्थेचा कारभार चालवून जास्तीत जास्त नफा मिळविल्याने संस्थेने लांभाष (डिव्हीडंड) १५ % दराने व कायमठेवीवर १० % व्याज देण्याची तरतूद केलेली आहे. व मुदतठेवीवर सभासद व बिगर सभासद यांना १०% व सेवानिवृत्त सभासद तसेच अपंग व विधवा

महिला यांना १०.५० % इतके भरीव व्याज दर देवून ७ % व्याज रिबेट देण्याचे व सभासदांचे हिताची काळजी घेतलेली आहे. सदरची बाब सस्थेचे दृष्टीने अभिमानास्पद आहे. भागभांडवल, कायमठेव, व मुदतठेव यामुळे संस्थेचा पाया भक्कम झालेला आहे.

तसेच संस्थेने अहवाल वर्षात सभासदांना कर्जाची रक्कम बॅकेंशी संपर्क करून ABB व RTGS द्वारे थेट त्यांचे बॅक खात्यात वर्ग करणेबाबत कार्यवाही केलेली आहे. तसेच संस्थेचे सभासद व कर्मचारी यांच्यात समन्वय राहावा. म्हणून कार्यालय CCTV अंतर्गत तसेच WI_FI अतंर्गत समाविष्ठ केलेले आहे. सभासदांचे कर्जातून होणारी शेअर्स अथवा कायमठेव कपात १० % ऐवजी ५ % करणेत आलेली आहे. तसेच मयत सभासदांचे संपुर्ण कर्ज माफ करून त्यांचे कुटूंबीयांना रू. ५ लाख कुंटूंब आधार योजनेअंतर्गत व दोन लाख रूपयांची मुदत ठेवपावती व शेअर्स व कायमठेव रक्कम परत देण्यात येते.तसेच हदयविकारासारखे आजारास रू ५० हजार आर्थिक मदत दिली जात आहे. या सर्व बाबी भुषणावह आहेत. तसेच सभासद अथवा त्यांचे मुला/मुलींचे विवाहाप्रित्यर्थ रू.११०००/- विवाहभेट देण्यात येते

**समान उद्येश्य असणारे पतसंस्थाकडून सभासदाचे कर्ज उचल**

सभासदांनी आपल्या सस्थेकडून कर्ज घेवून त्याची ठरवून दिलेल्या हप्त्याप्रमाणे नियीमत पणे फेड करावी. अन्य संस्थाकडून कर्ज घेवून स्वतःस व संस्थेस अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे कोणतेच कर्ज वेळेत आपण फेड करू शकत नाही. मासिक हप्त्याची थकबाकी होते . त्यामुळे संस्थेकडून प्रांसगीक वेळी कर्ज मिळण्यास अडचणी होते. त्यामुळे मानसिक समतोल बिघडून जातो. त्याचा कौटूंबिक व नोकरी विषयक जिवनावर अनिष्ट परिणाम होत आहे.याचा गंभिरपणे विचार करून आपण एकाच संस्थेकडून कर्ज घ्यावे व त्याची नियीमत ठरवून दिलेल्या हप्त्यात परत फेड दरमहा करावी. व सहकार कायद्यानुसार व जिल्हा सहकारी बॅकेचे नियमानुसार समान उद्येश्य असणारे संस्थेचे कर्ज घेणारे सभासदांना दुबार कर्ज वाटप करण्यात येत नाही. तरी यापुढे अश्या सभासदांनी संस्थेस सहकार्य करावे.

**सभासदांना जामीनकीचे जबाबदारी आवाहन**

संस्था सभासदांना रू. २६,००,०००/- पर्यत कर्ज देवून त्यांच्या प्रापंचिक गरजा पुर्ण करण्याचा नियमितपणे प्रयत्न करीत आहे. संस्थेचा एक हेतू आहे. कोणत्याही प्रंसगी आपल्या प्रासंगिक गरजा भागविण्यासाठी आपल्या ग्रामसेवक सभासदाला कोणाकडेही हात परसरावा लागू नये. आपल्या संस्थेत यावे. आणि कर्जरोखा (अवश्यक त्या स्टॅम्पसह) पुर्ण करून देवून कर्ज रक्कम तात्काळ सभासदांचे बॅक खात्यावर वर्ग करून घ्यावे. अशी सोय केलेली आहे. याचा फायदा सर्व सभासद गरजे नुसार अतिशय चांगल्या प्रकारे घेत आहेत. त्याच बरोबर हे ही लक्षात ठेवावे की, कर्जाचे रकमेत मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. जामीन होते वेळी साखळी पध्दतीने दोन / तिन कर्जदार सभासदास जामीन होण्याची दक्षता घ्यावी.

## प्रगतीदर्शक पंचवार्षिक तक्ता

| तपशिल | सन 2020–2021 | सन 2021–2022 | सन 2022–2023 | सन 2023–2024 | सन 2024–2025 |
|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | 1147 | 1203 | 1201 | 1206 | 1189 |
| वसुल भागभांडवल | 4,45,43,450 | 4,71,32,438 | 4,73,98,882 | 4,81,36,330 | 55126020 |
| कायम ठेव | 18,82,60,298 | 21,86,99,360 | 24,22,73,192 | 27,75,72,832 | 313326850 |
| मुदत ठेव | 33,48,04,548 | 61,10,68,892 | 93,50,64,732 | 1,17,04,69,555 | 1385383800 |
| कुटूब आधार ठेव | 18,75,500 | 72,84,230 | 1,21,03,095 | 1,68,87,123 | 21473223 |
| रिझर्व्ह फंड | 1,95,37,245 | 2,17,44,745 | 2,43,36,047 | 2,70,36,630 | 29815308 |
| इतर सर्व फंड | 3,06,10,610 | 8,04,29,104 | 11,15,48,850 | 17,52,65,263 | 259437960 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्व तरतूदी | 3,41,42,953 | 3,95,89,490 | 5,75,20,315 | 7,61,10,682 | 139202798 |
| बॅक कर्ज | 31,96,06,015 | 44,56,48,988 | 61,85,39,755 | 75,85,66,570 | 853778920 |
| नफा | 88,03,600 | 1,03,64,004 | 1,07,95,131 | 1,11,11,111 | 11420342 |
| रिझर्व्ह फंड गुंतवणूक | 3,45,77,224 | 3,89,36,196 | 4,39,95,029 | 4,99,54,630 | 56387878 |
| इतरसर्व गुंतवणूक | 3,80,30,275 | 6,00,00,250 | 9,00,00,250 | 10,00,00,250 | 10,00,00,250 |
| स्थावर मालमत्ता | 1,07,71,571 | 1,07,71,571 | 1,05,50,056 | 1,05,50,056 | 1,05,50,056 |
| सभासद येणे कर्ज | 89,47,73,907 | 1,36,93,95,809 | 1,90,48,18,791 | 2,39,47,99,782 | 2892702934 |
| ऑडीट वर्ग | अ | अ | अ | अ | अ |
| डिव्हीडंड | 15 % | 15 % | 15 % | 15 % | 15 % |

**सभासद संख्याः– 1189**

दिंनाक 31–03–2024 अखेर संस्थेची सभासद संख्या 1206 इतकी होती. दिंनाक 31–03–2025 अखेर सभासद संख्या 1189 इतकी झालेली आहे.

**वसुल भागभांडवल :– रु. 55126020/–**

दिंनाक 31–03–2024 अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रू. 48136330/– इतके होते.अहवाल वर्षात त्यात वाढ होवून दिं. 31–03–2025 अखेर रू. **55126020**/– जमा दिसत आहे.

**सभासदांचे ठेवीः– 1720183873/–**

**सदरचे ठेवींचे खालील प्रमाणे विवरण आहे.**

**अ) सभासद मुदत ठेव :– रू 1385383800/–**

दिंनाक 31–03–2024 अखेर सभासद मुदत ठेव रू. 1170469555 /– इतकी जमा होती. अहवाल वर्षामध्ये सदरचे ठेवी मध्ये वाढ होवून दिंनाक 31.03.2025 अखेर 1385383800/– जमा मुदत ठेवी आहेत.

**ब) सभासद कायम ठेव रू. 313326850/–**

दिंनाक 31–03–2024 रोजी सभासद कायम ठेव रू. 277572832/– इतके जमा होती. अहवाल सालात त्यात वाढ होवून दिंनाक 31–03–2025 अखेर सभासद कायम ठेव रू **313326850**/– इतकी जमा दिसत आहे.

**क) सभासद कुंटुब आधार ठेव :– रू 21473223/–**

दिंनाक 31–03–2024 रोजी सभासद कुंटूब आधार ठेव रू. 16887123/– इतके जमा होती. अहवाल सालात त्यात वाढ होवून दिंनाक 31–03–2025 अखेर सभासद कुंटूब आधार ठेव रू. **21473223** /– इतकी जमा दिसत आहे.

**एकूण फंड्स (निधी)**

दिंनाक 31–03–2025 अखेरीस फंड्स (निधी) आकडेवारी खालील प्रमाणे आहेत.

| तपशिल | दिंनाक 31–03–2025 |
|---|---|

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | 29815308.00 |
| कुटूंब कल्याण निधी | 2531500.00 |
| इमारत निधी | 175229133.40 |
| सभासद कल्याण निधी | 55840611.65 |
| विकास निधी | 1506850.95 |
| सेवक ग्रॅच्युईटी निधी | 10313419.00 |
| सेवक प्रॉ.फंड निधी | 5340438.00 |
| धर्मदाय निधी | 665243.50 |
| गुंतवणूक चढ उतार निधी | 66691.90 |
| डेडस्टॉक झिज फंड | 3273508.85 |
| एन.पी.ए. तरतुद | 4670563.26 |
| एकूण | **289253268.48** |

वरील प्रमाणे दिंनाक 31-03-2025 अखेर रू. **289253268.48** एकूण फंड्स (निधी) जमा दिसत आहेत.

**इतर देणी व तरतूदीः-**

दिंनाक 31-03-2025 अखेरीस इतर देणे व तरतुदी आकडेवारी खालील प्रमाणे आहेत.

| तपशिल | दिंनाक 31-03-2025 |
|---|---|
| पंचायत समिती देणे | 13137919.15 |
| सेवक व्यवसायकर | 244400.00 |
| ऑडीट फी देणे | 7306887.00 |
| कायमठेव व्याज देणे | 32714934.00 |
| ग्रामसेवक विकास निधी | 1053412.00 |
| संगणक मेन्टनस तरतूद | 5001674.00 |
| सहकार प्रशिक्षण तरतुद | 1814611.00 |
| सभासद व्याज रिबेट तरतूद | 55750000.00 |
| इन्कमटॅक्स ऑडीट फी देणे | 1584416.00 |
| वार्षिक सभा खर्च तरतूद | 2011760.00 |
| दिनदर्शिका छपाई तरतूद | 770444.00 |
| उत्तम जिंदगी तरतूद | 1700000.00 |
| निवडणूक निधी तरतूद | 4292579.00 |
| अधिलाभाष तरतूद | 1000000.00 |
| महानगरपालीका कर देणे | 220362.00 |
| कोर्ट केसेस तरतूद | 1500000.00 |
| सभासद भेट वस्तू तरतूद | 9099400.00 |
| एकूण | 139202798.15 |

वरील प्रमाणे संस्थेकडे दिंनाक 31-3-2025 अखेर रू. 139202798.15 देणे व तरतूदी दिसत आहे.

**बॅक कर्ज देणे :– रू 853778920.09**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.अहमदनगर या वित्तीय संस्थेकडून 1000 लाखाचे कॅश केडीट कर्ज मंजूर करून घेतलेले असून सदरचे कर्जाची दिंनाक 31.03.2025 रोजी 853778920.09 इतकी देणे बाकी दिसत आहे.

**नफा खाते :– रू. 11420341.95**

दिंनाक 31–03–2025 अखेर रू. 11420341.96 झालेला आहे. सदरचे नफयाची विभागणी खालील प्रमाणे सुचविलेली आहे.

| दिंनाक 31.03.2025 चा नफा | 11420341.95 |
|---|---|
| रिझर्व्ह फंड 25 % प्रमाणे | 2855086.00 |
| दिंनाक 31.03.2024 रोजी जमा असलेले शेअर्स रक्कम रू. 481366330.00 वर डिव्हीडंड (लांभाष) 15 % | 7220449.50 |
| धर्मदाय फंड | 44806.45 |
| अधिलांभाष तरतूद | 650000.00 |
| इमारत झिज फंड | 650000.00 |
| एकूण | 11420341.95 |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे नफा वाटणी करणेत आलेली आहे.

**रोख शिल्लका व बॅक शिल्लका :–**

दिंनाक 31–03–2024 अखेर रोख व बॅकेतील शिल्लक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | रक्कम |
|---|---|
| रोख शिल्लक | 0. 00 |
| बॅक सेव्हिंग खाते | 9829.87 |
| सेवक प्रॉ.फड बॅक खाते | 1163596.00 |
| सेवक ग्रॅच्युईटी बॅक खाते | 1940731.00 |
| स्टेट बॅक ऑफ इंडिया | 6209946.60 |
| एकूण | 9324103.47 |

वरील तपशिलाप्रमाणे दिंनाक 31–03–2025 अखेर रूपये 9324103.47 बॅक खाती शिल्लक आहेत.

**गुंतवणूकः– रू.156388128/–**

दिंनाक 31–03–2025अखेर गुंतवणूकीची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | दिंनाक 31–03–2025 |
|---|---|
| जिल्हा बॅक शेअर्स | 100000000.00 |
| रिझर्व्ह फंड गुंतवणूक | 56387878.00 |

| | |
|---|---|
| **वैशाली अपार्टमेंट शेअर्स** | 250 |
| एकूण | 156388128.00 |

वरील तपशिलाप्रमाणे दिनाक 31–03–2025 अखेर गुंतवणूक खाती रू. 156388128.00 जमा दिसत आहे.

**सभासद एकुण येणे कर्ज :– रू 2892702934.20**

**अ) साधे कर्ज :– रु. 2877491732.30**

दिनाक 31–03–2024 अखेर सभासदांकडे येणे साधे कर्ज रू. 2378563476 होते दिनाक 31.03.2025 अखेर येणे साधे कर्ज रू. **2877491732.30** दिसत आहे.

**ब) तातडी कर्ज :– रु. 1521201.95**

दिनाक 31–03–2024 अखेर सभासदांकडे येणे तातडी कर्ज रू. 16236306.00 होते दिनाक 31.03.2025 अखेर येणे तातडी कर्ज रू. **15211201.95** दिसत आहे.

**स्थावर मालमत्ता व डेडस्टॉक किंमत :–** रू. 1,05,50,056.00

1. संस्थेची बुरूडगांवरोड येथे सदनिका असुन सदरची सदनिकाची किंमत 0 आहे. सदरची सदनिका संस्था सभा मिटींग इ. करीता वापरत आहे.
2. संस्थेची माळीवाडा येथे सदनिका असून सदरचे सदनिकामध्ये संस्थेचे प्रशासकिय कार्यालय आहे. त्यांची किंमत रू.7,35,000.00 आहे.
3. संस्थेने तपोवनरोड, अहिल्यानगर येथे बहुउद्येशीय इमारतीकामी 17 गुंठे ॲम्युन्युटी प्लॉट खरेदी केलेला असून सदरचे ॲम्युन्युटीची जागेची किंमत रू.98,15,056.00 आहे.

**मयत सभासद कर्ज निवारण :–**

संस्थेचे सभासदांचे दुर्दवाने निधन झाल्यास त्यांचेकडेस असणारे संपुर्ण कर्ज (जमा शेअर्स व कायमठेव वजा जाता उर्वरीत कर्ज रक्कम )कल्याणनिधीतून माफ करून सभासदांचे वारसास कुंटुब आधार ठेव योजने अंतर्गत रू.पाच लाख मदत देवून कल्याणनिधीतून रू. दोन लाखाची मुदतठेव पावती देणेत येते.

**आर्थिक मदत :–**

आपले संस्थेचे सभासदांचे अपत्कालीन जळीता सारखी दुर्घटना किंवा हदयविकारा सारखे ऑपरेशन साठी रू.50,000/– पर्यंत आर्थिक मदत केली जात आहे.

**विवाहभेट योजना :–**

आपले संस्थेचे सभासद अगर सभासदांचे मुलगा अथवा मुलगी यांचे विवाहाप्रित्यर्थ रू.11,000.00 विवाहभेट देण्यात येते.

**लेखापरिक्षण :–**

आपले संस्थेचे दिनाक 01–04–2024 ते दिनाक 31–03–2025 या कालावधीचे शासकिय वैधानिक लेखापरिक्षण पी.एस.लांडगे प्रमाणित लेखापरिक्षक सहकारी संस्था अहिल्यानगर यांनी पुर्ण करून संस्थेस स्थापनेपासून असणारा ऑडीट वर्ग **अ** कायम ठेवलेला आहे.

**संगणीकरण :–**

तसेच संस्थेची स्वतः वेबसाईट सुरू केलेली असून सदर वेबसाईटवर संस्थेची तसेच स्वतः ची माहिती वसुली याबाबतची माहिती पहाता येते तसेच संस्थेने आपले संभासदांना दैनदिन व्यवहार कळणेकामी E.Pasbook ग्रामपास या नांवाने सुविधा सुरू केलेली आहे सदर पासबुक मध्ये आपल्याला घरपोच आपली खतावणी तसेच कपातीचा हिशोब दिला आहे..तसेच वेबसाईड तसेच ईमेल सुध्दा चालू केलेला आहे. तरी सर्व सभासद बंधू भगिनी यांनी आपले ईमेल आयडी व मोबाईल नंबर संस्थेस त्वरीत कळवावे आपले संस्थेचे संगणीकरणासाठी व त्यात वेळोवेळी नविन सुधारणा करणे कामी **प्राध्यापक संभाजीराव भोसले** सर यांचे अथक प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी आपले संस्थेस विनाविलंब व विनासायास तात्काळ वेळ दिल्याबद्यल आपले संस्थेचे वतीन त्यांचे आभार व्यक्त करतो.

**दप्तरी कामकाज :–**

संस्थेचे कामकाज संगणीकृत व हस्तलिखीत दोन्हीही प्रकारे व्यवस्थापक श्री.शेडाळे राजेंद्र सुखदेव व सेक्रेटरी श्री.घिगे पवनकुमार पोपटराव ? समाधानकारक व तत्पर केलेले आहे.

**ऋणनिर्देश :–**

अहवाल सालात कामकाज करीत असताना अथवा धोरणात्मक निर्णय घेत असताना संस्थेचे संचालक मंडळाकडून बहूमोल सहकार्य लाभले त्यामुळे संस्थेची उत्तरोत्तर प्रगती झालेली आहे. त्याबद्यल संस्थेचे सर्व संचालक मंडळाचे मी व्यक्तीगत आभारी आहे.

तसेच खालील मान्यवरांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बहूमोल सहकार्य केले

तसेच संस्थेचे सर्व सभासद व संचालक मंडळ यांनी केलेल्या सहकार्यातून मी यशस्वीपणे काम केले आहे. त्यांचे आभार मानून हा 47 वा वार्षिक अहवाल आपणापुढे सादर करीत आहे.
धन्यवाद

**आपला कृपाभिलाशी**
**श्री.सदानंद लहानू डोखे**
**चेअरमन**
**छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर**